# कला व इतर निबंध

मूळ लेखिका– भगिनी निवेदिता
अनुवाद– साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**कला व इतर निबंध : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये ३००/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# कला व इतर निबंध

# भगिनी निवेदिता

(अल्प परिचय)

भगिनी निवेदिता यांचे नाव पुष्कळ नवभारतीयांस माहीत नसते. ज्या ज्या वेळेस विद्यार्थ्यांजवळ मी निवेदितादेवींचे नाव काढले, त्या त्या वेळेस ते विचारीत, ''या निवेदिता कोण?'' ज्या विदुषीने ब्रह्मचारिणी राहून भारताची शेवटच्या श्वासापर्यंत सेवा केली, तिचे नाव माहीत नसणे ही कृतघ्नता आहे. दु:खाची गोष्ट ही की, या थोर सेविकेचे नीटसे चरित्रही कोणी लिहिले नाही. ज्या बंगालमध्ये राहून त्यांनी सारे जीवन दिले, त्या बंगाली भाषेतही त्यांचे सविस्तर चरित्र नाही. एक लहानसे पत्रकवजाच चरित्र आहे. असो.

भगिनी निवेदिता यांचे मूळचे नाव मार्गारिट ई. नोबल असे होते. विवेकानंदांची व त्यांची इंग्लंडमध्ये भेट झाली. अमेरिकेत अद्‍भुत विजय संपादून विवेकानंद इंग्लंडमध्ये गेले होते. त्यांच्या व्याख्यानास हजारो स्त्रीपुरुष जमत. निरनिराळ्या वेळी प्रश्नोत्तररूप चर्चाही होई. मार्गारिटवर विवेकानंदांची छाप पडली. त्यांचे विचार ऐकून त्यांच्या जीवनात क्रांती झाली. मार्गारिट अविवाहित होती. अनेक शास्त्रांचा तिने अभ्यास केला होता. गणितशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, चित्रकला अशा विविध विषयांचे सखोल अध्ययन तिने केले होते.

एके दिवशी विवेकानंदांस तिने विचारले, ''मी हिंदुस्थानासाठी काय करू?'' विवेकानंद म्हणाले. ''हिंदुस्थानात येऊन सेवा करा. हिंदी स्त्रियांना शिक्षण द्या. हिंदुस्थानात भयंकर अज्ञान आहे. सर्वत्र ज्ञान नेण्याची जरुरी आहे. भारतात या. खरेच या.''

मार्गारिटने निश्चय केला. स्वजन व स्वदेश सोडून ती भारतात येण्यासाठी निघाली! ज्या हिंदुस्थानला ब्रिटनने लुटले, त्या हिंदुस्थानची सेवा करावयास ही निघाली. ती हिंदुस्थानात आली. विवेकानंदांबरोबर हिंदुस्थानभर हिंडली. विवेकानंदांपासून ज्ञान घेत होती, अमृत पीत होती, श्रीरामकृष्ण परमहंसांच्या पुण्यकथा ऐकत होती. जीवनात नवविद्युत् संचरत होती.

त्या वेळेस हिमालयातील प्रवास चालला होता. मार्गारिट अस्वस्थ झाली होती. पुन्हा इंग्लंडमध्येच परत जावे असे तिच्या मनात आले. चलबिचल सुरू झाली. अनेक प्रकारच्या वैचारिक शंकाही मनात उद्‌भवत होत्या. मार्गारिट सचिंत होऊन बसली होती. तिकडून विवेकानंद आले. ज्ञानवैराग्याची ती पावनगंगा आली. त्यांनी मार्गारिटकडे पाहिले. ते म्हणाले, ‘‘चिंता करू नये.’’ असे म्हणून त्यांनी तिच्या मस्तकावर हात ठेवला. मार्गारिटची समाधी लागली. कित्येक वेळाने ती शुद्धीवर आली. अपार आनंदात बुचकळून जणू ती बाहेर आली. थोर अनुभव!

हिंदुस्थानात राहण्याचे ठरले. मार्गारिटचे नाव निवेदिता ठेवण्यात आले. निवेदिता म्हणजे अर्पण केलेली. निवेदितेने आपल्या जीवनाचा भारतास नैवेद्य दाखवला. श्री रामकृष्ण परमहंस व विवेकानंद यांच्या चरणी तिने जीवन वाहिले. निवेदितादेवी आपल्या प्रत्येक लेखाचे खाली ‘‘श्रीरामकृष्ण व विवेकानंद यांची निवेदिता’’ असे लिहीत.

विवेकानंद १९०२ मध्ये समाधिस्थ झाले. निवेदिता क्षणभर स्तिमित झाल्या, परंतु त्यांच्या जीवनात प्रकाशाचा अमर दीप लावला गेला होता. विपन्न भारत समोर उभा होता. अन्नहीन, वस्त्रहीन, ज्ञानहीन, स्वातंत्र्यहीन असा हा महान भारत त्यांच्या डोळ्यांसमोर होता. त्याच्या सेवेस त्या उभ्या राहिल्या.

हिंदुस्थानाला त्यांनी आपले मानले. तुम्हाआम्हाला ही भरतभूमी आपली वाटत नसेल, तितकी ती निवेदितादेवीस वाटे. आपला हा देश, आपले बंधू अशा शब्दांनी त्या हिंदुस्थानचा व हिंदी जनतेचा उल्लेख करीत. जणू त्या हिंदुस्थानात जन्मावयाच्या, परंतु चुकून तिकडे गेल्या.

१९०० च्या सुमारासच प्लेगही हिंदुस्थानात पसरत होता. कलकत्त्यासही ही साथ गेली. निवेदितादेवींनी खूप सेवा केली. कलकत्ता शहरातील गल्ल्यांतून फार घाण असे. निवेदितादेवी झाडू घेऊन गटारे व रस्ते साफ करीत. एक इंग्रज तरुणी सहा हजार मैलांवर येऊन भारतीयांचे रस्ते साफ करू लागली. आज मीराबाई तेच करीत आहेत; परंतु आम्ही हिंदी जनता काय करीत आहोत?

महर्षी सेनापती बापट नेहमी म्हणत असतात की, या देशात दोन प्रकारची घाण आहे. एक पारतंत्र्याची घाण व दुसरी अज्ञान व अस्वच्छता यांची घाण. ही दोन्ही प्रकारची घाण दूर करण्यासाठी निवेदिता उभ्या राहिल्या.

भारताला स्वातंत्र्यासाठी उद्युक्त करावयाचे होते! त्यासाठी राष्ट्रीयत्वाच्या कल्पनांचा प्रसार करणे आवश्यक होते. तरुणांच्यासमोर राष्ट्रीयत्वाचे तेजस्वी विचार नेले पाहिजे होते. शाळांतून, कॉलेजांतून, वर्तमानपत्रांतून, मासिकांतून... सर्व साधनांच्या द्वारा नवराष्ट्रनिर्मितीस चालना दिली पाहिजे होती. श्री. रोमा रोला या विश्वविख्यात फ्रेंच साहित्यिकाने विवेकानंदांचे जे चरित्र लिहिले आहे, त्यात ते म्हणतात, ‘‘विवेकानंद सर्व गोष्टींच्या आधी राष्ट्राचा उद्धार करणारे आहेत. "He is first essentially a nation-builder." खऱ्या धर्माचे ज्ञान नसल्यामुळे राष्ट्रास विकलता आली असे विवेकानंद म्हणत. या राष्ट्राचा उद्धार करावयाचा म्हणजे सद्धर्माची कल्पना दिली पाहिजे. व्यावहारिक वेदान्त शिकविला पाहिजे. प्रयोगालयातील वायू वेदातील मातरिश्वाइतकाच पवित्र आहे हे पटवले पाहिजे. भारताच्या विशाल संस्कृतीची, धर्मातील उदात्त तत्त्वांची भारतीय जनतेस विस्मृती पडली होती, म्हणून वाईट दिवस आले. विवेकानंदांना हा भारत केव्हा मुक्त झालेला पाहीन असे होई. ते म्हणत, ‘‘मला एक हजार सेवक द्या, परंतु ते सिंहाच्या छातीचे द्या. मी भारताचे रूप बदलून टाकीन.’’ विवेकानंद, ब्रह्माबांधव उपाध्याय व देशबंधू चित्तरंजनदास या तिघांच्या देशभक्तीस सीमा नाही, असे बंगालमध्ये मानतात. या देशांतील स्त्रियांची, हरिजनांची, रानटी लोकांची स्थिती डोळ्यांसमोर येऊन विवेकानंद रात्रीच्या रात्री रडत. असा हा महापुरुष होता. सर्व राष्ट्र चैतन्यमय व्हावे, तेजाने उठावे, ज्ञानाने फुलावे, स्वातंत्र्याने शोभावे असे त्यांना वाटे.

विवेकानंदांच्या मरणानंतर श्रीरामकृष्ण मिशन या संस्थेने हिंदुस्थानभर संस्था स्थापिल्या. या संस्थांमार्फत शिक्षण वगैरे काम केले जाते. दुष्काळ, पूर वगैरेंत मदत केली जाते. दवाखाने चालविले जातात. असे हे विधायक काम चालले आहे; परंतु या कार्यात राष्ट्र उठविण्याची ज्योत नाही. विवेकानंदांची ती राष्ट्र उभे करण्याची ज्वाला या कामात नाही. एकदा एक थोर सेवक निवेदितादेवीस भेटावयास गेला

होता. भेटल्यावर तो म्हणाला, ''आता बेलूर येथील श्री रामकृष्ण मिशनच्या मठात जाऊन येतो.'' निवेदिता म्हणाल्या, ''तुम्ही जा तेथे; परंतु तुम्हाला तेथे विवेकानंद सापडणार नाहीत.'' याचा अर्थ काय? याचा अर्थ एवढाच की, विवेकानंदांचे संपूर्ण दर्शन तेथे होणार नाही. राष्ट्र उभे करू पाहणाऱ्या विवेकानंदांस हे मठवाले पचवू शकत नाहीत. त्या मार्गाने जाऊन इच्छित नाहीत.

निवेदिता व श्री रामकृष्णमिशन यांचे मतभेद झाले. निवेदिता स्वतंत्रपणे काम करीत होत्या. त्यांना नवभारत पाहावयाचा होता. बंगाली तरुणांस त्यांनी राष्ट्रीयता शिकविली. कलकत्त्यातील त्यांची व्याख्याने मोठी स्फूर्तिदायक असत. एकदा त्या म्हणाल्या, ''रामायण व महाभारत का एकदाच लिहिले गेले? नाही. रामायण व महाभारत रोज लिहिले जात आहे. त्यात सामील व्हा. राष्ट्राचा नवा इतिहास बनवला जात आहे. त्यात भाग घ्या.''

निवेदिता सुंदर बोलत व उत्कृष्ट लिहीत. त्यांच्या लिखाणात एक प्रकारचे ओज आहे, प्रखरता आहे, स्फूर्ती आहे. भारतीय तत्त्वज्ञान, इतिहास, कला यांवर त्यांनी किती लिहिले? भारताचा आत्मा त्यांनी दाखविला. भारतीय कलांवरील त्यांचे लेख अनुपम आहेत. त्यांनी स्वत: युरोपियन चित्रकला व शिल्पकला यांचा मार्मिक अभ्यास केलेला होता. स्वत: युरोपातील उत्कृष्ट चित्रसंग्रहालये व शिल्पसंग्रह पाहिले होते. भारताचीही यात्रा करून मंदिरे, लेणी, गुंफा, मशिदी, किल्ले सर्व त्यांनी सहृदयतेने, भावभक्तीने व मार्मिकतेने पाहिले होते. भारतीय इतिहासाचा व कलांचा त्यांना किती अभिमान? भगवान बुद्ध, अशोक, अकबर, राणा प्रताप, शिवछत्रपती, चांदबिबी, अहिल्याबाई वगैरे नावे आठवताच त्यांची समाधी लागे. एकदा त्या बुद्धगयेला गेल्या होत्या. येथे भगवान बुद्धांस ज्ञान झाले, हा विचार मनात येऊन त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. तेथून जाताना तेथील एक दगड त्यांनी बरोबर नेला. तेथील अणुरेणू त्यांना पवित्र वाटत होता. तो दगड त्यांच्या टेबलावर असे. त्या दिल्लीला गेल्या होत्या. तेथील प्रख्यात खुदाबक्ष ग्रंथालयात शहाजहानचे हस्ताक्षर आहे. शहाजहान, मुमताज व ताजमहाल या तीन वस्तूंबद्दल निवेदितादेवींस फार वाटे. शहाजहानचे ते हस्ताक्षर पाहून त्यांचे हृदय उचंबळले. पत्नीची पवित्र स्मृती बाळगणारा, ताजमहाल बांधणारा शहाजहान त्यांच्या डोळ्यांसमोर आला. त्यांनी तेथील व्यवस्थापकास विचारले, ''मी या कागदाला क्षणभर हात लावू का?'' त्यांना परवानगी मिळाली. त्यांनी त्या हस्ताक्षराला हात लावला व डोळे मिटून उभ्या राहिल्या. ताजमहालचे स्वप्न पाहणाऱ्या शहाजहानच्या काळात जणू त्यांचा आत्मा जाऊन आला.

हिंदुस्थानातील अणुरेणूबद्दल, हिंदी वस्तूबद्दल, हिंदी इतिहासाबद्दल असे प्रेम कितीकांस आहे? आपण स्वत:ला भारतीय म्हणवतो, परंतु आपले हृदय असे उचंबळते का? निवेदिता हिंदुमुसलमानांच्या केवळ मारामाऱ्यांचा इतिहास पाहणारी नव्हती. थोर राष्ट्रीयतेच्या दृष्टीने पाहणारी होती. स्वामी विवेकानंद महंमदाच्या जन्मदिवशी उपवास करीत असत, ज्याप्रमाणे बुद्धजयंती, कृष्णजयंतीही ते करीत. अशा महापुरुषाच्या चरणांशी बसून निवेदितेने राष्ट्रसेवेचे व राष्ट्रीयतेचे धडे घेतले होते.

कलकत्त्यास ''मॉडर्न रिव्ह्यू'' हे मासिक १९०७ मध्ये सुरू झाले. कोणताही नवीन उपक्रम असो, त्याला निवेदिता साहाय्य व्हावयाच्या. या मासिकासाठी त्या नेहमी लिहीत. त्या लेखाची पुस्तके झाली आहेत. ते सारे लेख केवळ स्फूर्तिमय आहेत. हिंदुमुसलमान कशी नवसंस्कृती निर्मित होते, भारताचा संदेश काय, नवीन प्रश्न कसे हाती घेतले पाहिजेत, भारतीय कलांतील विशेष कोणता, एक वा दोन–शेकडो विषयांवर त्या लिहीत. त्यांच्या लिहिण्यात अभिजातता आढळून येते. प्रतिभा दिसून येते. इतिहाससंशोधक राजवाड्यांजवळ जशी एक प्रकारची प्रतिभा होती, तशी निवेदितादेवीजवळ होती.

त्या पाश्चिमात्य देशांतीलही वर्तमानपत्रास व मासिकांस लेख पाठवीत. लेख लिहूनच त्यांना स्वत:चा उदरनिर्वाह करावा लागे; परंतु एकदा एका युरोपियन संपादकाने ''अशा अशा प्रकारचे लिहाल, तर इतके पैसे देऊ'' असे सांगितले. निवेदितेने कळविले, ''मी लिहीन तसे हवे असेल तर कळवा. दुसऱ्यांच्या मतांप्रमाणे मी लिहीत नसते.'' त्या पैशासाठी लिहीत नसत. त्यांच्या लिहिण्यात त्यांचा आत्मा असे, त्यांना सापडलेले सत्य असे.

लेख लिहिणे व व्याख्याने देणे हे त्यांचे काम असेच; परंतु कलकत्त्यास त्यांनी मुलींची शाळा काढली. प्रथम या पाश्चिमात्य बाईच्या संस्थेत कोणी मुली पाठवेना. त्यांनी घरोघर जाऊन मुलींची भिक्षा मागावी. सायंकाळी शाळेतील मुली घरोघर नेऊन पोहोचवाव्या. त्यांची तपश्चर्या फलद्रूप होऊ लागली. शाळा भरभराटली.

ही शाळा म्हणजे त्यांचे जीवन. सर्व काही शाळेसाठी. रात्रंदिवस शाळेचे चिंतन. जे काम हाती घ्यावयाचे त्यात सारा आत्मा ओतावयाचा, ही तर गीतेची शिकवण.

पै न् पै या शाळेसाठी खर्च होई. निवेदिता तपस्विनीप्रमाणे राहात. त्यांच्या खोलीत काही नसण्याचे सौंदर्य होते. त्या खोलीत फक्त एक चित्र होते. ते त्यांच्या शाळेतील एका मुलीने काढलेले होते. आपल्या शाळेतील विद्यार्थ्याने काढलेल्या चित्राने आपली खोली सजविणारे कितीसे शिक्षक असतील? एकदा प्रख्यात कलाभ्यासी व कलाटीकाकार श्री कुमारस्वामी निवेदितादेवींस भेटावयास आले होते. कलेवर बोलणे झाल्यावर कुमारस्वामी खोलीतील ते चित्र पाहून म्हणाले, ''सुंदर आहे हे चित्र.'' निवेदिता म्हणाल्या, ''आमच्या शाळेतील मुलीने काढले आहे ते.'' कुमारस्वामी निघून गेल्यावर निवेदितादेवी त्या मुलीच्या घरी धावत गेल्या व म्हणाल्या, ''पाहिलेस, कुमारस्वामींनीसुद्धा तुझे चित्र चांगले ठरविले. केवळ मीच नाही. चांगलेच आहे तुझे चित्र.'' त्या मुलीला किती आनंद झाला असेल? खरा शिक्षकच असे करू शकतो.

एकदा निवेदितादेवी आपल्या खोलीत बसल्या होत्या. कलकत्त्यास उन्हाळ्यात फारच उकडते. जसे शिजल्यासारखे होते. निवेदिता आपल्या खोलीत पुठ्ठ्याच्या एका तुकड्याने वारा घेत होत्या. इतक्यात कोणीतरी मुलाखतीसाठी आले. मुलाखतवाला म्हणाला, ''एखादा पंखा का नाही घेत विकत?'' ही थोर सेविका म्हणाली. ''पंखा कसा घेऊ? तो आणा माझ्या शाळेसाठी नको का?'' किती संस्थाचालकांस आपल्या संस्थेविषयी असे प्रेम असेल, तिच्यासाठी असा त्याग करावा असे वाटत असेल?

राष्ट्रीयत्वाचा अभिमान आपल्यापेक्षा निवेदितादेवींना सहस्रपटीने अधिक वाटे. आपल्या देशी बोलण्यात मधून इंग्रजी शब्द येतात. त्यांना हे खपत नसे. एके दिवशी त्यांच्या शाळेतील मुली आपसात बोलताना ''लाइन लाइन'' हा शब्द वरचेवर उपयोगीत होत्या. निवेदिता जात होत्या. त्या थांबल्या व म्हणाल्या ''लाइन लाइन काय म्हणता? त्याला बंगाली शब्द कोणता?'' मुलींना पटकन सांगता येईना. एकीने ''रेखा'' हा शब्द सुचविला. निवेदितेस परमानंद झाला. त्या म्हणाल्या, ''हां, बरोबर. लाइन म्हणजे रेखा. रेखा.'' असे म्हणून तो शब्द घोकीत त्या निघून गेल्या.

त्यांनी प्रौढ स्त्रियांसाठीही वर्ग उघडले. बंगाली स्त्रियांत पडदा आहे. पडदानशीन स्त्रिया येणार कशा? शेवटी निवेदितादेवी एका घरी जात. तेथे बाया जमत. निवेदिता तेथे शिकवीत व मग बायका पुन्हा पडदानशीन होऊन आपापल्या घरी जात. काही दिवस या घराशेजारीच त्या स्वत: येऊन राहिल्या.

अशा रीतीने स्त्रीशिक्षणास त्यांनी चालना दिली. लेखांनी, भाषणांनी, राष्ट्रीयत्वास व राष्ट्रीय संस्कृतीच्या विविध अंगांस चालना दिली. भारतीय कला व इतिहास यांचा कसा अभ्यास करावा ते शिकविले. भारतीय कलांतून व संस्कृतीतून सर्वत्र प्रतीकवाद कसा आहे ते दाखवले. हे सारे करीत असता, रस्ते झाडणे, आजाऱ्यांची शुश्रूषा करणे वगैरे कामे चालूच असत. बंगालमध्ये नेहमी पूर येतात. गावेच्या गावे वाहून जातात. मग दुष्काळ, रोग फैलावतात. अशा प्रसंगी निवेदिता आधी धावून जात. एकदा असाच पूर आला होता. रोगराई फैलावली होती. त्या पावसात, त्या दलदलीत त्या गेल्या. सेवेस त्यांनी वाहून घेतले; परंतु त्या अपार श्रमाने त्याच आजारी पडल्या. त्यांना हिवताप जडला. तो थांबेना. त्या काही दिवस अमेरिकेत जाऊन आल्या; परंतु हिंदुस्थानात आल्यावर पुन्हा आजारी पडल्या. त्या काम करीतच राहिल्या. ''पुन्हा परदेशात जाऊन या.'' असे कोणी म्हटले तर त्या म्हणत, ''गरिबाने कोठे जायचे पुन:पुन्हा !''

प्रकृती फारच बिघडली. फारच आग्रह धरला, तेव्हा त्या दार्जिलिंग येथे गेल्या. स्वच्छ बर्फाच्छादित हिमालयाची शिखरे पाहून त्या दु:ख विसरत; परंतु आजार कमी होईना. मृत्यू जवळ आला. तो दिवस उजाडला. उष:काल होत होता. निवेदितादेवी म्हणाल्या, ''तो पाहा उष:काल, तो पाहा प्रकाश ! तो भारताचा उष:कालही बघा, ती पाहा नवभारताची प्रभा ! भारताची नाव तीराला लागेल !'' हेच शेवटचे शब्द. भाग्याचा उष:काल बघत त्या देवाजवळ गेल्या. त्यांची नाव तीराला पोचली. भारताची कधी बरे पोचेल?

१९१२ मध्ये त्या देवाकडे गेल्या. जळजळीत, तेजोमय, सेवामय, प्रतिभासंपन्न जीवन! आपले समृद्ध जीवन भारतासाठी त्यांनी दिले. रसमय, परमपवित्र असे जीवितपुष्प भारतमातेच्या चरणी वाहिले. निवेदितादेवींचे चरित्र डोळ्यासमोर येऊन मला लाज वाटते व त्यांच्या चरित्रातील तळमळ सहस्रांशाने माझ्यात येवो, असे सदैव वाटत असते.

निवेदितादेवींच्या काही संस्फूर्त व सुंदर विचारांनी भरलेल्या पुस्तकांची मी १९३२-३३ मध्ये नाशिकच्या तुरुंगात भाषांतरे केली होती. ती प्रसिद्ध झाली नाहीत. त्या भाषांतरांपैकी कलेवरील निबंधांचे भाषांतर आज प्रसिद्ध होत आहे. भारतीय चित्रकला व शिल्पकला यावरील निवेदितादेवींचे विचार उद्‌बोधक वाटतील व नवदृष्टी देतील, अशी मला आशा आहे.

– साने गुरुजी

# अनुक्रमणिका

## कला व इतर निबंध


२. राष्ट्रीय भावना निर्माण करण्यात कलेची कामगिरी ....... १५
३. कलेचा संदेश ....... ३१
४. भारतीय शिल्प ....... ४१
५. ताजमहालाचे स्वप्न पाहणारा शहाजहान ....... ५१
६. सती ....... ५६


## राष्ट्रीय हिंदुधर्म


१. धर्म ....... ६१
२. हिंदुधर्माची श्रेष्ठता ....... ६७
३. हिंदुधर्म व संघटना ....... ७२
४. त्यागवृत्ती ....... ७९
५. माणसांप्रमाणे वागा ....... ८७
६. तळमळ ....... ९१
७. सामर्थ्य ....... ९५
८. खरी महत्त्वाकांक्षा ....... ९९
९. चारित्र्य ....... १०७
१०. विवेक ....... १११
११. पात्रता ....... ११५
१२. आत्मप्रौढी ....... १२०
१३. अनुभव ....... १२६
१४. कर्मद्वारा साक्षात्कार ....... १३०
१५. श्रद्धेचे सामर्थ्य ....... १३३
१६. कमळ व भ्रमर ....... १३९

१७. विचारांचा विकास ....... १४५
१८. राष्ट्रीय धर्म ....... १४८
१९. जबाबदारी ....... १५४
२०. ध्येय ....... १६६
२१. मृत्यूवर विजय ....... १७४
२२. भूत व भविष्य ....... १७९
२३. प्रपंच व परमार्थ ....... १८४

**समाजधर्म**

१. समाज ....... १९५
२. सहकार्य ...... २०२
३. पंथप्रियता ...... २०७
४. व्यापक व वाढते विधिशास्त्र ...... २१३
५. सुखविलास व पुरुषार्थ ...... २१६
६. स्वातंत्र्य ...... २२०
७. गुरू व शिष्य ...... २२६
८. पूजेचे फूल ...... २३४
९. जीवनाला वळण देणे ...... २४१
१०. प्रगती ...... २४६
११. धर्म व राष्ट्रीय अभ्युदय ...... २४९
१२. शिक्षक ...... २५४
१३. श्रम ...... २६१
१४. आपल्यासमोर उभे असलेले काम ...... २६५
१५. जगाला जवळ घेणारी नीती ...... २८६
१६. चारित्र्य म्हणजेच आध्यात्मिकता ...... २९५

✦✦✦

# राष्ट्रीय भावना निर्माण करण्यात कलेची कामगीरी

हिंदुस्थानातील राष्ट्रीय भावना कोणते स्वरूप घेऊ पाहात आहे? कोणता आकार घेऊ पाहात आहे? स्वत:ची कर्तव्ये, स्वत:ची ध्येय, स्वत:ची आध्यात्मिकता पुन्हा एकदा आपलीशी करण्याचा हा प्रयत्न आहे. सर्वच दिशांनी आज पुनर्रचना, पुनर्घटना करावयाची आहे. हे सर्व करीत असतानाच आपण राष्ट्र या पदवीस पोचू. आपण आता राष्ट्र बनू लागलो आहोत. आरंभ झाला आहे. कोणतीही पुनर्घटना, कोणताही फरक विध्वंसक स्वरूपाचाच असतो. राष्ट्रीयतेचे ध्येय नैतिक व आध्यात्मिक स्थिरता देण्यासाठी आले आहे. हे ध्येय आपणांस मुक्त करण्यासाठी आले आहे. आज ह्या राष्ट्रातील कोणत्याही क्षेत्रातील धडपड पाहा. त्या धडपडीत आपण राष्ट्र व्हावे, ही भावना प्रामुख्याने दिसून येते. राष्ट्रीयतेचाच विचार स्पष्टपणे या धडपडीतून दिसतो. भारतातील धडपडणाऱ्या मुशाफरांच्या समोर राष्ट्रीयतेचा ध्रुवतारा आज सारखा चमकत आहे.

उदाहरणार्थ, आपण स्त्रीजातीची सुधारणा, स्त्रियांची स्थिती याचा विचार करू या. स्त्रियांची जी संस्कृती आहे तिच्याकडे वळू या. स्त्रियांच्या संस्कृतीतही नवीन दिशा आखावयास हवी का? या बाबतीतही मोडतोड करायला पाहिजे का? याही गोष्टीत फरक करण्याची, बदल करण्याची जरूर आहे का? जर पाहिजे असेल तर कोणत्या बाबतीत? कोणती दिशा? आपण आज सारे धावपळ करीत आहोत, निराश होत आहोत, नाशाकडे जणू जात आहोत. या गोष्टीपासून आपण आपला आधी

बचाव करून घेतला पाहिजे; आणि मग निश्चयाने व दृढरीतीने नीट सुसंघटित झाले पाहिजे, एकजीव झाले पाहिजे. आपण स्वावलंबी, स्वाश्रयी, स्वत:चे ध्येय समजलेले, स्वत:च स्वत:ला प्रेरणा देणारे असे झाले पाहिजे... थोडक्यात राष्ट्रीय वृत्तीचे होण्याचा आपण दृढ निश्चय केला पाहिजे. हा दृढ निश्चय झाला म्हणजे मग कोणत्या दिशेने प्रगती करीत जायचे, ते आपोआप दिसू लागेल. फरक तर केलाच पाहिजे. सारे जगत् बदलत आहे, पुढे जात आहे. साऱ्या जगातील राष्ट्रांच्या घडामोडी होत आहेत. मग भारतही नवे नवे आकार, नवे नवे रूप धारण करणार नाही का? कात टाकलेल्या सर्पाप्रमाणे पुन्हा सतेज होणार नाही का? परंतु जे काही फरक करावयाचे ते नीट विचारपूर्वक करावयाला हवेत. आपण स्वत:च्या इच्छेने, स्वत:च्या मताने करायला हवेत. उगीच कोणाचे अंध अनुकरण करावयाचे नाही. आपण कोणाचे गुलाम होऊन नाचावयाचे नाही. स्वतंत्रपणे आपण आपल्या माड्या बांधू, घरे बांधू. आज शेकडो वर्षे शतकानुशतके आपल्या नारी जातीसमोर सीतासावित्री यांचे आदर्श आहेत; जिजाई, अहिल्याबाई यांचे आदर्श आहेत. हे आदर्श सोडून आज आपल्या भगिनी काडीमोड करणाऱ्या होणार काय? त्यांना फुलपाखरे बनवायची काय? हिंदुस्थानातील पद्मिनी जाऊन तिच्या जागी ग्रीक हेलन येणार काय? फरक तर करायला हवाच आहे; फेरबदल केला नाही, तर हिंदुस्थानचा उज्ज्वल भूतकाळ बुडून जाणार यात शंका नाही. भूतकालीन संस्कृती टिकवण्यासाठीच फेरफार करावयाचा आहे. फरक तर केलाच पाहिजे... त्याशिवाय तरणोपाय नाही; परंतु प्राचीन, भूतकालीन गंभीरता, पूज्यता, शहाणपणा ही ठेवून त्यात नवीन ज्ञानाची भर घालू या. प्राचीन पवित्रता काही झाले तरी गमावता कामा नये. जे आधीच विशुद्ध आहे, निर्मळ आहे, त्याच्यावर जर आणखी जबाबदाऱ्या टाकल्या, त्याचे कार्यक्षेत्र जर विशाल केले, तर ते अधिकच निर्मळ होईल.गंभीर ज्ञान आणखी गंभीरतर करू... व या ज्ञानांतून नवीन उदात्त कोमलता निर्माण होईल. भावी भारतातील मातांचे ध्येय भारतामाता– ही थोर माता ठरवीत आहेत; ती स्वत:च्या हाताने ते घडवीत आहे; अशी आपण हृदयात श्रद्धा व आशा बाळगू या. भावी भारतातील मातांचे हे ध्येय अभिनव, सुंदर व रमणीय होईल. ते इतके मनोहर व उदात्त होईल की, प्राचीन काळातील ध्येयस्वप्नांची मेणबत्ती नवीन उदयोन्मुख अर्वाचीन साक्षात्कारांच्या उष:कालासमोर फिकी पडेल, अंधुक वाटेल.



आपणांसमोर अनेक प्रश्न आहेत. त्यांतील स्त्रीशिक्षण हा एक झाला; परंतु सर्वच बाबतीत आपणास नवीन प्रकाश निर्माण करावयाचा आहे, नवीन दिशा घ्यावयाची आहे, नवीन मार्ग पत्करावयाचा आहे. शिक्षण, शास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, सर्वत्र नवीन सर्चलाईट पाडावयाचा आहे. सामाजिक बाबतीत कोणत्या सुधारणा आधी हव्यात, कोणत्या करणे योग्य, कोणत्या करणे अयोग्य, या बाबतीत आपण कितीतरी वेळ काथ्याकूट केला व कालापव्यय केला; परंतु या बाबतीत चर्चा करण्याइतकी पात्रताच आपल्यामध्ये नव्हती, ही त्यातील खरी गोष्ट. आपणांस नीट ज्ञान नव्हते, जबाबदारी नीट आपण ओळखीत नव्हतो व आपणास विचार करण्यास अवसर नव्हता. परकीयांची टीका व सल्ला यांनाच गुरू मानून आपण काहीतरी बोलू लागलो, वाहून जाऊ लागलो. सुधारणा करण्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान जगात फार दुर्मीळ असते, ते मिळवणे फार दुष्कर असते; परंतु कोणत्या बाबतीत कसेकसे फरक घडवून आणावयाचे, या महत्त्वाच्या बाबतीत निश्चित दिशा ठरवण्यासाठी ज्ञान, जबाबदारीची जाणीव व नीट मनन या गोष्टींची जरूर आहे. राष्ट्रीयतेची भावना हृदयात वाढू लागताच आपणास जणू मग दुसरे विचारडोळे येतात, नवीनच एखादे बुद्धिंद्रिय फुटते; आपणास नवीन चिरस्फूर्ती येते. परस्परांतील संबंध व ऐक्य दिसून येऊ लागते. वृक्षाच्या फांद्या, पाने, फुले, फळे, मुळे यांचा नीट संबंध समजून येऊ लागतो. ही दृष्टी आली म्हणजे मग आपणाला राष्ट्राच्या भवितव्यतेची चर्चा करण्याचा अधिकार मिळतो.

आपणास भारतीय कलांच्या बाबतीत तर इतर क्षेत्रांच्या आधी गेले पाहिजे. कला राष्ट्राचे जीवन बनवीत असतात. जे कलांचे ध्येय, ते राष्ट्रांचे ध्येय होय. कलांमध्ये प्राण ओतला म्हणजे राष्ट्रामध्ये प्राण संचरेल. राष्ट्रांतील बुद्धिमान लोक एकत्र येऊन भारताच्या भूत व भविष्य कलेबद्दल विचारविनिमय करीत आहेत, अशी आपण कल्पना करू या. या बुद्धिमान लोकांनी काय शोधावयाचे? त्यांनी कशाचा निर्णय करावयाचा?

हिंदू धर्माचा एक विशेष हा आहे की, हिंदू धर्म म्हणजे प्रतीकशाळा आहे. प्रत्येक कल्पनांची, विचारांची प्रतीके आहेत. म्हणजेच हिंदुधर्म मूर्तिपूजक आहे. अडाणी, शेतकरी, बाजारात बसणारा–हिंडणारा अत्यंत दरिद्री मनुष्य यांनाही चित्र आवडते, प्रिय वाटते, त्यांना ते समजते. एखादे सुंदर भांडे, एखादा पुतळा, एखादे नक्षीकाम पाहून त्यांना आनंद वाटतो. हिंदुस्थानातील नयन–संस्कृती पूर्ण विकसित

झालेली आहे. इटलीबद्दल असेच म्हणतात. सौंदर्य पाहावयास डोळे दिलेले आहेत. हिंदुस्थानातील प्राचीन मूर्तिपूजेने डोळ्यांपासून हृदयाला जाऊन मिळावयास अत्यंत जवळचा रस्ता शोधून काढला आहे. सरळ व समीपवर्ती रस्ता; या रस्त्याने अनेक गेले, अनेक जात आहेत. या मूर्तिपूजेचे महत्त्व विश्वव्यापक आहे; तिची हाक सर्व हृदयांना ऐकू जाते. चित्र नेहमी आपली भाषा बोलते, आपली कथा सांगते, न चुकता सांगते व ती भाषा सर्वांना समजते. तुमची बोलण्याची भाषा कोणतीही असो. तुम्ही सुशिक्षित असा वा नसा. चित्र तुमच्या हृदयाजवळ बोलेल. आपले घर नेमके सापडावे म्हणून उंबऱ्यात दिवा लावून ठेवून नदीवर गेलेली गृहिणी, तुळशीजवळ लावून ठेवलेला दिवा, सायंकाळी सूर्यदेव मावळला म्हणजे गायींचे घरी गोठ्यात येणे, अशा प्रकारचे देखावे जर रंगवले गेले, चितारले गेले तर सर्व भारतीयांच्या हृदयांना एकच संदेश दिला जाईल; कला म्हणजे सर्वांना समजणारी भाषा, सर्वांची भाषा; राष्ट्राची पुनर्रचना करताना, राष्ट्राचे मंदिर, मातृ-मंदिर पुन्हा उभारताना या सर्वसामान्य भाषेचे फार महत्त्व आहे. या कलेचेही पुनर्जीवन झाले पाहिजे. पुनर्जीवन म्हणण्यापेक्षा, पुनर्जन्म म्हणण्यापेक्षा, पुनर्जागृती म्हणणे युक्त होईल; कारण हिंदुस्थानात कलाविकासाची महान युगे अनेकदा येऊन गेली व ती मेली असे म्हणता येणार नाही. ज्या काळात हत्ती खोदले गेले, त्या काळात हिंदुधर्माची संघटना होत होती. सर्व पृथक्करणांतून एकता निर्माण होत होती. अर्वाचीन यथार्थवादी चित्रकलेइतकेच अजिंठ्याच्या सुंदर चित्रकलेत माधुर्य व कौशल्य आहे. कला स्वतंत्र होती, जिवंत होती, सृष्टीचे बारीकसारीक नाजूक रूप दर्शवणे, सृष्टीतील अनंत कोमल छटा दर्शविणे वगैरे गोष्टी त्या कलेला उत्कृष्ट साधल्या होत्या. सांची, अमरावती, गांधार येथे शिल्पकलेची आणखी उत्क्रांती होत गेली. मधूनमधून पुन्हा कलेला उत्साह पूर येत होते. मुसलमानी अमदानीतही स्वतंत्र कलेचा विकास व विलास चाललाच होता. कलेचा आकार बदलला, बाह्यरूप बदलले, परंतु अंतरात्मा बदलला नाही. भारतातील कला अनुकरण करणारी झाली नव्हती; ती स्वत:ची सृष्टी निर्माण करणारी होती. मुसलमानी काळात शिल्पकलेला नवीन वळण मिळाले. कलेचा आत्मा नवीन शिल्पकलेत प्रकट होऊ लागला.

या सर्व काळांतील विशिष्ट शक्ती व प्रतिभा ही आज आपण आपलीशी करून घेतली पाहिजे. हे राष्ट्रीय युग आहे. प्राचीन काळातील सर्व उत्कृष्ट ते घेऊन पुढे



जावयाचे अशी ही वेळ आहे. भूतकाळाशी नीट संबंध जोडून घेणे यातच नवीन विजयाची किल्ली आहे. ज्याला भूतकाळ नाही, त्याला भविष्य नाही. जेथे पाया नाही तेथे कळस नाही; मूळ नाही तेथे शेंडा नाही; भांडवलाशिवाय व्यापार कसा करणार? अर्वाचीन विद्यार्थ्यांनी ही गोष्ट ध्यानात धरली पाहिजे. भूल करून चालणार नाही. एकाएकी विशाल, विराट संसार पाहण्याचा कठीण, परंतु भव्य, दिव्य प्रसंग त्याच्यावर आला आहे. या दिव्यातून यशस्वीपणे त्याला पार पडावयाचे आहे. आपल्या लोकांनीच निर्माण केलेल्या गोष्टीतील कल्पनाशक्तीने त्याची दृष्टी, त्याची शक्ती आज बांधली गेलेली नाही. तो स्वतंत्र आहे. पूर्वजांप्रमाणे स्वजननिर्मितीबद्ध नाही. ईजिप्तच्या कलेची ग्रीक कलेशी तो आज तुलना करू शकेल. मध्ययुगीन इटालियन व डच कलेची अर्वाचीन फ्रेंच कलेशी तुलना करू शकेल. आजूबाजूची विशाल सृष्टी पाहून त्यातील आपले स्थान तो ओळखील व त्याची सृष्टी जास्त विशाल, स्वतंत्र व मुक्त होईल, स्वत:चे स्थान जर त्याला माहीत नसेल तर मात्र नुकसान होईल. कुंपणाशिवाय न वाढणाऱ्या लहान रोपाच्या भोवतालचे कुंपन काढून घेण्याप्रमाणे ते होईल.

भारताने केवळ प्राचीन कलेच्याच हाका ऐकायच्या, असे नाही; कलेमध्ये नावीन्य आणावयाचेच नाही असे नाही; आपणास बहिष्कार घालावयाचा नाही, परंतु भारताला कलेची परंपरा आहे; या परंपरेच्या शाळेत भारतीय मन शिकले आहे. भारतीय संस्कृतीत ही कला रंगलेली आहे; या कलेभोवती भारतीय वातावरण उभारलेले आहे; इटली अथवा ग्रीस देशातील कलेच्या भाषेत इथल्या लोकांजवळ बोलणे चुकीचे होईल. भारतीय चित्रकला, जर ती अभिजात भारतीय राहावयाची असेल, खरी भारतीय राहावयाची असेल व जर तिला थोर पदवीस जावयाचे असेल, श्रेष्ठ स्थान मिळवावयाचे असेल, तर त्या कलेने भारतीय हृदये हलवली पाहिजेत; भारतीय रीतीने भारतीय मनाजवळ बोलले पाहिजे; जो विचार, जी भावना भारतीय मनाला परिचित असेल किंवा सहजगम्य असेल तीच चितारली पाहिजे, तीच चित्रद्वारा प्रकट केली पाहिजे; एवढेच नव्हे तर त्या कलेला परमोच्च स्थान द्यावयाचे असेल तर तिने पाहणाऱ्याच्या मनात अशी भावना उत्पन्न केली पाहिजे, असे काहीतरी दिव्यदर्शन त्याला घडवले पाहिजे की, ते चित्र पाहून पाहणारा उन्नत होईल, त्याचे हृदय थोर होईल; परंतु हे सारे कला राष्ट्रीय असल्याशिवाय होणार नाही; राष्ट्राच्या,